

# -: संत श्री. सावता माळी :-

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।

लसूण मिरची कोथिंबीरी। अवघा झाला माझा हरी ।।

असे म्हणत आपल्या शेतात भक्तीचा मळा फुलवणारे श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संतकवी म्हणजे “संत सावता माळी”.

सोलापूर जिल्ह्यातील, माढा तालुक्यातील ‘अरण’ हे त्यांचे गाव आहे. त्यांचे आजोबा दैवू माळी हे विठ्ठलभक्त होते. मराठवाड्यातील ‘औसे’ हे त्यांचे मूळ गाव आहे. ते एकदा पंढरपूरहून आल्यानंतर अरण या गावी आले. काही दिवस ते मंदिरात राहिले नंतर त्यांनी याच गावात जागा घेऊन घर बांधून स्थायिक झाले. सावता माळी यांचे वडील ‘पुरसोबा’ हे धार्मिक वळणाचे होते. शेतातील कामे करत इश्वराचे भजन व पूजन करीत असत.

आपल्या घरातूनच विठ्ठलभक्तीचे संस्कार मिळाल्याने लहानपणापासूनच सावता महाराजांना ईश्वरभक्तीची गोडी निर्माण झाली. परमेश्वर भेटीची तळमळ त्यांच्या मनात निर्माण झाली. एकदा पहाटे पांडुरंगाचे स्मरण करत असताना ते एकाग्र झाले. ‘‘माझे चित्त तुझ्या चरणी राहू दे, माझ्या प्रत्येक कृतीत तुझा अंतर्भाव राहू दे, तूच माझे सर्वस्व आहेस. मला तुझा ध्यास लागला आहे’’ असे म्हणाले. त्यांचा तो उत्कट भक्तिभाव पाहून साक्षात

विठ्ठल त्यांच्यासमोर उभा राहिला. ते स्वतः कधी पंढरपूरला गेले नाहीत; पण पंढरपूरचा पांडुरंग त्यांच्या भेटीला आला.

आजही पंढरपूरची पालखी सावतोबांन भेटायला येते. रात्रंदिवस ते विठ्ठलाचे चिंतन करू लागले. त्यांच्या ध्यानीमनी फक्त विठ्ठलाचेच नाव होते.

संत सावता महाराज श्रेष्ठ संतकवी होते. संत ज्ञानेश्वर महाराजांपेक्षा २५ वर्षांनी व संत नामदेव महाराजांपेक्षा २० वर्षांनी मोठे होते. अवघे ४५ वर्षे आयुष्य लाभलेल्या या संतकवीने भक्ती व ज्ञानाची बीजे पेरून भावभक्तीचा मळा फुलवला. वयाने ज्येष्ठ असूनही संतांना देव मानून त्यांच्या सहवासाची मागणी त्यांनी परमेश्वराकडे केली.

ते म्हणतात -

मागणे ते आम्हा नाही हो कोणासी । आठवावे संतांसी हेचि खरे ।

आपला व्यवसाय हाच परमार्थ मानून शेतात, मळ्यात राबवत असताना विठ्ठलाचे भजन व नामस्मरण केले. शेतात येणाऱ्या हिरव्यागार पिकात तसेच नांगरणी केलेल्या ढेकळात पांडुरंगाचे रूप पाहिले. 'भक्तीमध्येच खरे सुख व आनंद आहे. ऐहिक जीवनात कर्तव्यकर्मे करत असताना काया-वाचा-मने ईश्वरभक्ती करता येते. ईश्वरभक्तीचा अधिकार सर्वांना आहे", असे सांगून जनमाणसांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवला. संत सावता माळी यांचे एकूण ३७ अभंग उपलब्ध आहेत. त्यांचे अभंग काशीबा गुरव लिहून ठेवत असत. संत सावता महाराजांनी धार्मिक प्रबोधन आणि भक्तिप्रसाराचे कार्य निष्ठेने केले. आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७ (इ.स.१२९५) रोजी ते अनंतात विलीन झाले.

- श्री. अवधूत तांबवेकर.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.
२. संत सावता माळी - श्री. महेश पुजारी.
३. संत सावता माळी मुलगी - कु. तेजस्विनी सुर्वे.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. प्रशांत मुंढेकर.
४. श्री. गणेश गायकवाड.
५. श्री. प्रथमेश कुलकर्णी.
६. श्री. ओमकार पाटील.
७. श्री. आशुतोष गोळे.
८. श्री. के. एन. देसाई सर.

लोकेशन -

देसाई मळा, काले, कराड

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.
२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. ओमकार पाटील.
४. श्री. गणेश गायकवाड.
५. श्री. के. एन. देसाई सर.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.

    लेखन - श्री. अवधूत तांबवेकर.

- लेख संकलन -

    श्री. दीपक आफळे

- ध्वनीमुद्रण - सौ. अवंती कुलकर्णी.
- ध्वनिमुद्रिका -